# COVID-19 Vaccination camp

# कोविड१९ प्रतिबंधक मोफत लसीकरण शिबीराचे आयोजन

दि.२८/१०/२०२१ रोजी विद्यार्थी विकास विभाग व भालोद येथील प्राथमिक आरोग्य केंद्र यांच्या वतीने **कोविड.१९ प्रतिबंधक मोफत लसीकरण शिबीराचे आयोजन** करण्यात आले. सदर कार्यक्रम प्रसंगी प्राचार्य डॉ. ए.एस.कोल्हे प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉ प्राजक्ता चव्हाण, डॉ. राहूल चौधरी, यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी डॉ. दिनेश पाटील, प्रा.मोहिनी तायडे, प्रा.राकेश चौधरी यांच्यासह प्राध्यापक,शिक्षकेतर कर्मचारी वर्ग यांचे सहकार्य लाभले.







जळगाव

तरुण भारत

## भालोद महाविद्यालयात कोविड लसीकरण शिबीर

**फैजपूर ता.यावल :** कला व विज्ञान महाविद्यालय भालोद येथे विद्यार्थी विकास विभाग व प्राथमिक आरोग्य केंद्र भालोद यांच्या संयुक्त विद्यमाने मिशन युवा स्वास्थअंतर्गत २८ रोजी कोविड-१९ पहिला व दुसऱ्या डोससाठी लसीकरण कार्यक्रम आयोजित करण्यात आले. महाविद्यालयातील ज्या विद्यार्थ्यांनी लसीकरण केले नव्हते, अशा विद्यार्थ्यांना या शिबिरात लसीकरणाची संधी उपलब्ध करून दिली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए.एस.कोल्हे यांच्या अध्यक्षतेखाली झालेला हा लसीकरण कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्राथमिक आरोग्य अधिकारी डॉ. राहूल चौधरी, डॉ. प्राजक्ता चव्हाण, रवींद्र पालवे, भैरव चौधरी, श्रीमती बी.जी.राणावत, श्रीमती मंगला पाटील यांचे सहकार्य लाभले. महाविद्यालयातील विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.डॉ. दिनेश पाटील, महिला विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.मोहिनी तायडे तसेच महाविद्यालयातील प्रा.राकेश चौधरी यांच्यासह प्राध्यापक वर्ग व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग यांनी लसीकरण शिबीर यशस्वीतेसाठी सहकार्य केले. प्रास्ताविक डॉ. दिनेश पाटील यांनी केले. आभार प्रा.मोहिनी तायडे यांनी मानले. यानंतरही लसीकरण मोहीम सुरू राहणार असून ज्या विद्यार्थ्यांचे लसीकरण बाकी आहे, त्यांनी डॉ. दिनेश पाटील, प्रा.मोहिनी तायडे यांच्याकडे नावनोंदणी करावी असे आवाहन करण्यात आले आहे.

## Medical Checkup Camp

## प्रथम वर्षे बी.ए.व बी.एस्सी वर्गातील विद्यार्थ्यांसाठी वैद्यकीय तपासणी शिबिर आयोजित

दि.२७/१२/२०२१ रोजी महाविद्यालयात प्रवेशित **प्रथम वर्षे बी.ए.व बी.एस्सी वर्गातील विद्यार्थ्यांसाठी वैद्यकीय तपासणी शिबिर आयोजित** करण्यात आले. प्राथमिक वैद्यकीय अधिकारी डॉ. प्राजक्ता चव्हाण डॉ. अमोल महाजन यांनी मार्गदर्शन केले व विद्यार्थ्यांची तपासणी केली.प्राचार्य डॉ. ए.एस.कोल्हे,डॉ दिनेश पाटील, प्रा.मोहिनी तायडे यांनी सदर कार्यक्रम आयोजित केला.





S.E.S's Art's & Science College BHALOD Dist. Jalgaon

Acting Principal
S.E.Society's
Art's & Science College
Bhalod.Dist.Jalgaon.